महाराष्ट्राचा हक्काचा आवाज

दैनिक बीड **लोकनेता**

Lokneta News - लोकनेता न्युज

● मुख्य संपादक : ज्ञानेश्वर मुंडे ●

प्रतिनिधी नेमणूक सुरु आहे

Epaper: www.dainiklokneta.in/

दैनिक लोकनेता

दैनिक लोकनेता या दैनिकासाठी संपूर्ण महाराष्ट्राभर प्रतिनिधी नेमणूक सुरू आहे तरी इच्छुकांनी खालील इमेल किंवा नंबर वरती संपर्क साधावा. पात्र उमेदवारांना योग्य पदावर संधी देण्यात येईल.

मुख्य कार्यालय: मिरकाळा ता. गेवराई जि.बीड 7046383112

dnyaneshmofficial@gmail.com 7499615933

शुक्रवार दि.१० एप्रिल २०२६ RNI-MAHMAR/2023/89402 Email : dnyaneshmofficial@gmail.com वर्ष : ०३ अंक : २३७ किंमत २ रुपये 7499615933



# संत परंपरेच्या दिव्य तेजात न्हालेला नारळी सप्ताह लाखो भाविकांच्या साक्षीने भव्य सांगता सोहळा

## नाथ संप्रदायाचा आध्यात्मिक वारसा समाजाला दिशा देणारा–मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस







लोकनेता न्यूज नेटवर्क

**आष्टी (अण्णासाहेब साबळे)**

श्रीक्षेत्र गहिनीनाथगडाच्या संत परंपरेचा गौरवशाली वारसा जपत संत वामनभाऊ महाराज यांच्या ५० व्या पुण्यतिथीनिमित्त आयोजित ९४ व्या नारळी सप्ताहाचा सांगता सोहळा म्हसोबाचीवाडी येथे अत्यंत भक्तिमय, शिस्तबद्ध आणि उत्साहपूर्ण वातावरणात संपन्न झाला. लाखो भाविकांच्या उपस्थितीत पार पडलेला हा सोहळा श्रद्धा, संस्कार आणि अध्यात्मिक उर्जेचा अद्वितीय संगम ठरला.

मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी आपल्या भाषणात संत वामनभाऊ महाराजांच्या कार्याचा गौरव करताना सांगितले की, नाथ संप्रदायातील ही परंपरा केवळ धार्मिक नसून समाज परिवर्तनाची प्रभावी शक्ती आहे. अंधश्रद्धा दूर करून सात्विक समाज घडवण्याचे महान कार्य संत वामनभाऊ महाराजांनी केले. गहिनीनाथ महाराजांनी रुजवलेली भक्ती परंपरा त्यांनी पुढे नेली आणि आज मठाधिपती विठ्ठल महाराज तीच ताकदीने जोपासत आहेत.

ते पुढे म्हणाले की, गहिनीनाथगड हे केवळ तीर्थक्षेत्र नसून समाजाला एकत्रित करणारे अध्यात्मिक केंद्र आहे. या ठिकाणच्या विकासासाठी आवश्यक सर्व सुविधा उभारण्यास शासन कटिबद्ध आहे.

**धार्मिक विधींनी सुरुवात; महंत विठ्ठल महाराजांचे प्रभावी प्रास्ताविक**

कार्यक्रमाच्या प्रारंभी गहिनीनाथगडाचे मठाधिपती ह.भ.प. विठ्ठल महाराज यांनी पारंपरिक धार्मिक विधींनी सोहळ्याची सुरुवात केली. संत वामनभाऊ महाराजांच्या चरणी नतमस्तक होत त्यांनी उपस्थितांना अध्यात्मिक संदेश दिला.

त्यानंतर आपल्या प्रास्ताविकातून गहिनीनाथगडाच्या संत परंपरेचे महत्त्व अधोरेखित करत त्यांनी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्यासह सर्व मान्यवरांचे सन्मानपूर्वक स्वागत केले.

व्यासपीठावरील मान्यवरांची उपस्थिती

ह.भ.प. विठ्ठल महाराज – मठाधिपती, गहिनीनाथगड

देवेंद्र फडणवीस – मुख्यमंत्री, महाराष्ट्र राज्य

ना. पंकजाताई मुंडे – पर्यावरण व पशुसंवर्धन मंत्री

आ. धनंजय मुंडे – माजी मंत्री

आ. सुरेश धस – आमदार

जयदत्त क्षीरसागर – माजी मंत्री

भीमराव धोंडे – माजी आमदार

बाळासाहेब आजबे – माजी आमदार

साहेबराव दरेकर – माजी आमदार

शंकर देशमुख – भाजप जिल्हाध्यक्ष

प्रताप ढाकणे

शिवदास शेकडे – सरपंच

सौ.प्रतिभा मल्हारी शिंदे – सरपंच, गौखेल

इतर मान्यवर व हजारो भाविक

**संतांचा सहवास म्हणजे जीवन परिवर्तन : ना. पंकजाताई मुंडे**

पर्यावरण मंत्री पंकजाताई मुंडे म्हणाल्या की, संतांचा सहवास लाभला की सामान्य माणूसही अध्यात्मिक उंची गाठतो. परिसाच्या स्पर्शाने लोखंड सोने होते, त्याचप्रमाणे संतांच्या सान्निध्यात माणसाचे जीवन उजळून निघते.

त्या पुढे म्हणाल्या की, लोकनेते गोपीनाथ मुंडे यांनी गडाच्या गादीचा सन्मान करण्याची शिकवण दिली. नारळी सप्ताहाची परंपरा भाविकांनी जपली असून तेच या गडाची खरी ताकद आहेत.

त्रिवेणी संगम' ठरलेला ऐतिहासिक सोहळा : आ. धनंजय मुंडे आ. धनंजय मुंडे यांनी या सोहळ्याचे वर्णन 'त्रिवेणी संगम' असे करत, महंत विठ्ठल महाराजांचे गाव, मुख्यमंत्र्यांची उपस्थिती आणि भाविकांचा उत्साह हा अद्वितीय संगम असल्याचे सांगितले. ऊसतोड कामगारांच्या योजनांना बळ देण्याची आवश्यकता त्यांनी अधोरेखित केली.

**विकासकामांसाठी ठोस मागण्या : आ. सुरेश धस**

आ. सुरेश धस यांनी गहिनीनाथगडाच्या अध्यात्मिक महतीचे वर्णन करत सांगितले की, या स्थानाची ऊर्जा अद्वितीय आहे. अहमदनगर–बीड मार्गाच्या रुंदीकरणासह अपघातप्रवण ठिकाणांची दुरुस्ती करण्याची त्यांनी मागणी केली.

**गहिनीनाथगड ते पंढरपूर दिंडी मार्गाची मोठी घोषणा**

वारकरी भावनेचा सन्मान राखत मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी गहिनीनाथगड ते पंढरपूर दिंडी मार्ग विकसित करण्याची महत्त्वपूर्ण घोषणा केली. या घोषणेचे भाविकांनी जल्लोषात स्वागत केले.

**भक्ती, शिस्त आणि व्यवस्थापनाचा आदर्श संगम**

राज्यभरातून लाखो भाविक या सप्ताहासाठी उपस्थित होते. एसटीचे सुयोग्य नियोजन, चोख पोलीस बंदोबस्त आणि भाविकांनी घेतलेला शिस्तबद्ध महाप्रसाद यामुळे सोहळा अत्यंत यशस्वी ठरला.

**मान्यवरांकडून महंत विठ्ठल महाराजांचा सन्मान**

यावेळी महंत विठ्ठल महाराज यांचा पुष्पगुच्छ देऊन सामाजिक कार्यकर्ते तथा मुस्लिम मावळा पत्रकार समीर शेख,आज मराठी (डिजिटल आवृती) चे संपादक अविश्रांत कुमकर, लोकशाही पत्रकार संघ जिल्हा उपाध्यक्ष तथा जागतिक लोकवार्ता (डिजिटल आवृत्ती) संपादक व दैनिक लोकनेता सहसंपादक अण्णासाहेब साबळे,पत्रकार दादासाहेब पवळ, पत्रकार मारूती क्षेत्रे यांनी चरणदर्शन घेऊन विशेष सत्कार केला.

**श्रद्धा, संस्कार आणि एकात्मतेचा भव्य उत्सव**

संत वामनभाऊ महाराजांनी सुरू केलेली नारळी सप्ताहाची परंपरा आजही तितक्याच भक्तिभावाने जोपासली जात आहे. यंदाचा सांगता सोहळा श्रद्धा, एकात्मता आणि अध्यात्मिक उर्जेचा प्रेरणादायी, भव्य आणि अविस्मरणीय उत्सव ठरला.

# 'सिंघम' स्टाईल दणका

## नांदेड ग्रामीण पोलीस स्टेशनचे पोलीस निरीक्षक ओमकांत चिंचोलकर यांच्या नेतृत्वाखाली २५ गुन्हेगारांची धिंड



लोकनेता न्यूज नेटवर्क

**नांदेड | अनिल पाटील तेलंग**

नवीन नांदेड शहरात गुन्हेगारांनी कितीही डोके वर काढले तरी कायदा त्यांच्यापेक्षा वरचढ आहे, हे नांदेड ग्रामीण पोलिसांनी पुन्हा एकदा सिद्ध केले आहे. नांदेड ग्रामीण पोलीस ठाण्याचे पोलीस निरीक्षक ओमकांत चिंचोलकर यांच्या मार्गदर्शनाखाली रात्री राबवलेल्या विशेष कोम्बिंग ऑपरेशनमध्ये २५ सराईत गुन्हेगारांना बेड्या ठोकण्यात आल्या.

**भररस्त्यातून काढली धिंड:**

गुन्हेगारांमधील कायद्याची भीती संपली असल्याचे चित्र असतानाच, पीआय चिंचोलकर यांनी आक्रमक पवित्रा घेतला. पकडलेल्या सर्व २५ आरोपींना ग्रामीण पोलीस स्टेशन ते स्थानिक गुन्हे शाखा (डउइ) कार्यालयापर्यंत पायी चालवत नेत त्यांची धिंड काढली. गुन्हेगारांचा माज उतरवण्यासाठी आणि सर्वसामान्यांच्या मनात सुरक्षेची भावना निर्माण करण्यासाठी ही कारवाई करण्यात आली.

**कारवाईचे वैशिष्ट्य**

पीआय ओमकांत चिंचोलकर यांच्या 'अ‍ॅक्शन मोड'मुळे गुन्हेगारांचे धाबे दणाणले.

रात्रीच्या अंधारात 'कोम्बिंग ऑपरेशन' राबवून रेकॉर्डवरील गुन्हेगारांचा शोध.

नांदेडमधील वाढत्या गुन्हेगारीला लगाम लावण्यासाठी पोलिसांचा मोठा इशारा.

नांदेडच्या या 'दबंग' पोलीस निरीक्षकाच्या कारवाईचे सध्या सोशल मीडियावर जोरदार कौतुक होत आहे.

# राजुरात गुणवंतांचा गौरव; MPSC व पोलिस भरतीत यशस्वी उमेदवारांचा सत्कार

लोकनेता न्यूज नेटवर्क

**चंद्रपुर | सिद्धेश्वर केंद्रे**

राजुरा शहरात शासकीय सेवेत उल्लेखनीय यश संपादन करणाऱ्या गुणवंतांचा गौरव सोहळा उत्साहपूर्ण वातावरणात पार पडला. चझडउ परीक्षेत यश मिळवत कर सहाय्यक पदावर निवड झालेल्या प्रणय यादव ढोले तसेच महाराष्ट्र पोलिस दलात शिपाई पदासाठी निवड झालेल्या शुभांगी विठ्ठल शतपलकर या दोन्ही होतकरू उमेदवारांचा विशेष सत्कार करण्यात आला.



या प्रसंगी ज्येष्ठ समाजसेवक ड. वामनराव चटप यांच्या हस्ते शाल, श्रीफळ व पुष्पगुच्छ देऊन दोन्ही गुणवंतांचा सन्मान करण्यात आला. यावेळी उपस्थित मान्यवरांनी या यशस्वी उमेदवारांचे कौतुक करत त्यांच्या चिकाटी, मेहनत आणि जिद्दीचे विशेष कौतुक केले.

कार्यक्रमाला दिलीप देरकर (उपनगराध्यक्ष, नगर परिषद राजुरा), रमेश नळे (नगरसेवक), दिलीप देठे (संचालक, कृ.उबास राजुरा), प्रभाकर ढवस, स्वप्नील मोहुर्ले (नगरसेवक), कपिल इद्दे, पुंडलिक वाढई, बळीराम खुजे, अनिल बाळसराफ तसेच सौरभ मादासवार आदी मान्यवर मोठ्या संख्येने उपस्थित होते.

यावेळी वक्त्यांनी सांगितले की, ग्रामीण भागातील विद्यार्थ्यांनी कठोर परिश्रम, सातत्य आणि योग्य मार्गदर्शनाच्या जोरावर मोठे यश मिळवता येते, याचे उत्तम उदाहरण म्हणजे प्रणय ढोले आणि शुभांगी शतपलकर आहेत. त्यांच्या यशामुळे परिसरातील इतर तरुणांना प्रेरणा मिळणार असल्याचेही मत व्यक्त करण्यात आले. कार्यक्रमाच्या शेवटी उपस्थितांनी दोन्ही उमेदवारांना पुढील वाटचालीसाठी शुभेच्छा देत त्यांच्या उज्वल भवितव्याची कामना केली.

**महाराष्ट्र शासनाच्या अंदाज समितीचे सदस्य रयत क्रांती संघटनेचे अध्यक्ष शेतकरी नेते आमदार मा.सदाभाऊ खोत यांचे नांदेड शासकीय विश्रामगृहात स्वागत करताना बालाजी पाटील ढोसणे,न गरसेवक शंकर चिंतमवाड, जाहूरचे चे उपसरपंच रमाकांत पाटील जाहूरकर,कोळनूर चे निळकंठ पाटील**



# लिंबागणेश पाणीपुरवठा विहिरीच्या मोटारची वायर दीड महिन्यात २ वेळा चोरी

## नेकनुर पोलिसांपुढे चोरट्यांचे आव्हान!पोलिस प्रशासन घटनास्थळी दाखल

लोकनेता न्यूज नेटवर्क

**बीड । विजय रोडे**

बीड तालुक्यातील लिंबागणेश गावात ग्रामपंचायतीमार्फत सुरू असलेल्या पाणीपुरवठा योजनेतील विहिरीच्या मोटारीची विद्युत वायर गेल्या दीड महिन्यात तब्बल दोन वेळा चोरीला गेल्याने ग्रामस्थांमध्ये संतापाची लाट उसळली आहे. गावाच्या पिण्याच्या पाण्याचा मुख्य स्रोत असलेल्या या योजनेवर परिणाम होत असून पाणीटंचाईचा प्रश्न ऐरणीवर आला आहे.या वारंवार होणाऱ्या चोरीमुळे ग्रामपंचायतीवर मोठा आर्थिक बोजा पडत असून आतापर्यंत सुमारे दीड लाख रुपयांचे नुकसान झाल्याची माहिती सरपंच बालासाहेब जाधव यांनी दिली. यापूर्वी झालेल्या चोरीबाबत नेकनुर पोलीस ठाण्यात तक्रार दाखल करण्यात आली होती. मात्र, पुन्हा चोरी झाल्याने ग्रामस्थांमध्ये नाराजी व्यक्त होत आहे. पोलिसांनी तातडीने कारवाई करून चोरट्यांचा बंदोबस्त करावा, अशी मागणी करण्यात येत आहे.

दरम्यान, आज (दि.०४) नेकनुर पोलीस स्टेशनचे पोलीस उपनिरीक्षक आप्पासाहेब रोकडे व लिंबागणेश पोलीस चौकीचे सहाय्यक फौजदार विठ्ठल राठोड यांनी भायाळा साठवण तलाव परिसरातील चोरीच्या घटनास्थळी भेट देऊन पाहणी केली. यावेळी सरपंच बालासाहेब जाधव,





डॉ. गणेश ढवळे, विक्रांत वाणी, विनायक वाणी, शिवाजी वाणी तसेच पाणीपुरवठा कर्मचारी सुखदेव वाणी उपस्थित होते.

डॉ. गणेश ढवळे यांनी सांगितले की, भायाळा साठवण तलावातून लिंबागणेश व पोखरी गावांना पाणीपुरवठा केला जातो. अशा परिस्थितीत सार्वजनिक विहिरीच्या मोटारींच्या वायरची वारंवार चोरी होणे हे गंभीर असून चोरट्यांनी पोलिस प्रशासनालाच आव्हान दिले आहे. यामुळे ग्रामस्थांना पाणीटंचाईचा सामना करावा लागत असून चोरट्यांचे मनोबल वाढत आहे. त्यामुळे तातडीने कारवाई करून चोरीच्या घटनांना आळा घालावा, अशी मागणी त्यांनी केलीलिंबागणेश पाणीपुरवठा विहिरीच्या मोटारची वायर दीड महिन्यात २ वेळा चोरी; नेकनुर पोलिसांपुढे चोरट्यांचे आव्हान ! पोलिस प्रशासन घटनास्थळी दाखल

लिंबागणेश (दि.०४) : बीड तालुक्यातील लिंबागणेश गावात ग्रामपंचायतीमार्फत सुरू असलेल्या पाणीपुरवठा योजनेतील विहिरीच्या मोटारीची विद्युत वायर गेल्या दीड महिन्यात तब्बल दोन वेळा चोरीला गेल्याने ग्रामस्थांमध्ये संतापाची लाट उसळली आहे. गावाच्या पिण्याच्या पाण्याचा मुख्य स्रोत असलेल्या या योजनेवर परिणाम होत असून पाणीटंचाईचा प्रश्न ऐरणीवर आला आहे.

या वारंवार होणाऱ्या चोरीमुळे ग्रामपंचायतीवर मोठा आर्थिक बोजा पडत असून आतापर्यंत सुमारे दीड लाख रुपयांचे नुकसान झाल्याची माहिती सरपंच बालासाहेब जाधव यांनी दिली. यापूर्वी झालेल्या चोरीबाबत नेकनुर पोलीस ठाण्यात तक्रार दाखल करण्यात आली होती. मात्र, पुन्हा चोरी झाल्याने ग्रामस्थांमध्ये नाराजी व्यक्त होत आहे. पोलिसांनी तातडीने कारवाई करून चोरट्यांचा बंदोबस्त करावा, अशी मागणी करण्यात येत आहे.

दरम्यान, आज (दि.०४) नेकनुर पोलीस स्टेशनचे पोलीस उपनिरीक्षक आप्पासाहेब रोकडे व लिंबागणेश पोलीस चौकीचे सहाय्यक फौजदार विठ्ठल राठोड यांनी भायाळा साठवण तलाव परिसरातील चोरीच्या घटनास्थळ भेट देऊन पाहणी केली. यावेळी सरपंच बालासाहेब जाधव, डॉ. गणेश ढवळे, विक्रांत वाणी, विनायक वाणी, शिवाजी वाणी तसेच पाणीपुरवठा कर्मचारी सुखदेव वाणी उपस्थित होते.

डॉ. गणेश ढवळे यांनी सांगितले की, भायाळा साठवण तलावातून लिंबागणेश व पोखरी गावांना पाणीपुरवठा केला जातो. अशा परिस्थितीत सार्वजनिक विहिरीच्या मोटारींच्या वायरची वारंवार चोरी होणे हे गंभीर असून चोरट्यांनी पोलिस प्रशासनालाच आव्हान दिले आहे. यामुळे ग्रामस्थांना पाणीटंचाईचा सामना करावा लागत असून चोरट्यांचे मनोबल वाढत आहे. त्यामुळे तातडीने कारवाई करून चोरीच्या घटनांना आळा घालावा, अशी मागणी त्यांनी केली आहे.

# डीजे वाजविण्यास परवानगी देऊ नये

लोकनेता न्यूज नेटवर्क

**श्रीक्षेत्र माहूर । डॉ.भारत उद्धव राठोड**

शहरात विविध महापुरुषांच्या जयंती पुण्यतिथी निमित्य व इतर प्रासंगीक आनंदोत्सवात मोठ्या व कर्णकर्कश आवाजात डीजे लावल्या जातात. सदरील डीजेच्या कर्णकर्कश आवाजाने शहरातील बालके व हृदयविकाराचे आजार असणारे शहरातील नागरिक यांना खूप त्रास सहन करावा लागतो. त्यामुळे कुठल्याही कार्यक्रमात डिजे लावण्यासाठी परवानगी देऊ नये, अशी मागणी उपविभागीय पोलीस अधिकारी किरण कुमार भोंडवे, पोलीस निरीक्षक देविदास चोपडे यांच्याकडे निवेदनाद्वारे शिवसेनेचे तालुका संघटक विनोद पाटील सूर्यवंशी यांनी केली आहे.डीजेच्या आवाजाने अनेक नागरिकांना तात्काळ रुग्णालयात उपचारासाठी दाखल होऊन मृत्यूशी झुंज देण्याची सुद्धा गंभीर वेळ येते. सुदैवाने आजपर्यंत अशी एखादी जीवितहानीची घटना घडली नसली तरीही भविष्यात एखादी दुर्दैवी घटना घडणारच नाही याची कुणीही शास्वती देऊ शकत नाही. करिता पवित्र तीर्थक्षेत्र




म्हणून जगभर ओळख असलेल्या माहूर या तीर्थक्षेत्रावर सर्व प्रकारच्या मिरवणुका पारंपारिक वाद्य, मंगल वाद्य लावून होणे आवश्यक असून डीजे या वाद्याला कायमस्वरूपी बंदी घालणे आवश्यक आहे. माहूर शहरात कोणत्याही महापुरुष जयंती मिरवणूक असो किंवा धार्मिक कार्यक्रम असो त्यामध्ये डीजे लावण्यास परवानगी देण्यात येऊ नये व डीजे मुक्त मिरवणुकीचे शहर घोषित करण्यात यावे अशी विनंती शिवसेनेचे तालुका संघटक विनोद पाटील सूर्यवंशी यांनी निवेदनाद्वारे उपविभागीय पोलीस अधिकारी किरणकुमार भोंडवे पोलीस निरीक्षक देविदास चोपडे यांच्याकडे केली आहे.

## मनाठा पोलीस स्टेशन येथे शांतता समितीची बैठक संपन्न

# महामानव डॉ बाबासाहेब आंबेडकर यांचे १३५ वी जयंती डीजे व डॉल्बी न लावता पारंपारिक वाद्य लावून सामाजिक उपक्रम राबवून साजरी करावी : सहाय्यक पोलीस निरीक्षक चवळी

लोकनेता न्यूज नेटवर्क

**हदगांव । चंद्रकांत भोरे**

मनाठा पोलीस स्टेशनच्या वतीने दि, ०९/०४/२०२६ रोजी मनाठा पोलीस स्टेशन येथे शांतता समितीच्या बैठकीचे आयोजन करण्यात आले होते.

मनाठा पोलीस स्टेशनच्या कार्यक्षेत्रात महामानव डॉ बाबासाहेब आंबेडकर जयंती १४ ते ३० एप्रिल दरम्यान मोठ्या उत्साहात साजरी केली जाते. जयंती निमित्ताने विविध सामाजिक, सांस्कृतिक, कार्यक्रम राबवले जात असतात यावर्षी भारतरत्न डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांची १३५



वी जयंती मोठ्या उत्साहात साजरी होणार आहे.

जयंती व उत्सवामध्ये डीजे,व डॉल्बी न लावता पारंपारिक वाद्य बँड पथक लावून व विविध सामाजिक व सांस्कृतिक उपक्रम राबवून जयंती साजरी करावी असे

आव्हान मनाठा पोलीस स्टेशनचे सहाय्यक पोलीस निरीक्षक विलास चवळी यांनी केले आहे.

मनाठा पोलीस स्टेशनच्या कार्यक्षेत्रात असलेले दर्याबाई (उमरी ) मंडळाच्या वतीने डीजे ,डॉल्बी,बंद जयंती साजरी करण्याचा निर्णय घेतला आहे.गावामध्ये जयंतीच्या दिवशी सर्व निदान भव्य आरोग्य शिबिर,रांगोळी, स्पर्धा, निबंधक स्पर्धा, लेझीम स्पर्धा, १८ तास अभ्यास उपक्रम असे अनेक उपक्रम राबवण्याचा निर्णय घेतला आहे. या जयंती मंडळाचा पोलीस स्टेशनच्या वतीने सत्कार करण्यात आला आहे.या बैठकीला पोलीस पाटील, जयंती मंडळाचे अध्यक्ष, सामाजिक कार्यकर्ते पत्रकार बांधव मोठ्या संख्येने उपस्थित झाले होते.

# माजी खा.सुभाषराव वानखेडे साहेब यांनी घेतली उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांची भेट

## हदगाव नगरपरिषदेसाठी निधीची मागणी केली

लोकनेता न्यूज नेटवर्क

**हदगाव । कृष्णा पाटील हरडफकर**

हिंगोली लोकसभा! माजी खासदार *सुभाषरावजी वानखेडे साहेब यांनी आज महाराष्ट्र राज्याचे उपमुख्यमंत्री **ना. एकनाथभाई शिंदे* यांची त्यांच्या 'नंदनवन' या शासकीय निवासस्थानी सदिच्छा भेट घेतली. या भेटीदरम्यान मतदारसंघातील विविध विकासकामांवर सविस्तर चर्चा करण्यात आली असून, प्रामुख्याने *हदगाव नगरपरिषदेला* जास्तीत जास्त निधी उपलब्ध करून देण्याची आग्रही मागणी वानखेडे साहेब यांनी केली.

विकासकामांवर महत्त्वपूर्ण चर्चा

या बैठकीत हदगाव-हिमायतनगर मतदारसंघातील प्रलंबित प्रश्न आणि स्थानिक विकासाच्या मुद्द्यांवर चर्चा झाली.



हदगाव शहराच्या विकासासाठी आणि मूलभूत सुविधांच्या बळकटीकरणासाठी मोठ्या निधीची आवश्यकता असल्याचे वानखेडे साहेब यांनी उपमुख्यमंत्र्यांच्या निदर्शनास आणून दिले. यावर सकारात्मक प्रतिसाद देत, विकासकामांसाठी आवश्यक तो निधी उपलब्ध करून देण्याचे आश्वासन उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी दिले आहे प्रमुख नेत्यांची उपस्थिती**

या प्रसंगी राजकीय क्षेत्रातील अनेक दिग्गज नेते उपस्थित होते, ज्यात:

* *माजी मंत्री जयप्रकाश मुंदडा*
* *माजी आमदार सुभाष साबणे*
* *शिवा बोंढारे*
* *शुभम देशमुख*

या भेटीमुळे हदगावमधील विकासकामांना आता नवी गती मिळण्याची शक्यता निर्माण झाली असून, कार्यकर्त्यांमध्ये उत्साहाचे वातावरण आहे.

# पाथर्डी शहरातील नागरी समस्यांकडे पालिकेचे दुर्लक्ष पत्रकार देवढे यांनी निवेदनातून मांडला तक्रारींचा पाढा

लोकनेता न्यूज नेटवर्क

**पाथर्डी । श्री लक्ष्मण डांगे**

शहरातील सार्वजनिक सुविधांचा बोजवारा उडाला असून, नागरिकांना भेडसावणाऱ्या मूलभूत समस्यांकडे नगर परिषदेने तातडीने लक्ष द्यावे, अशी मागणी पत्रकार राजेंद्र देवढे यांनी नगराध्यक्ष अभयराव आव्हाड यांना दिलेल्या निवेदनाद्वारे केली आहे. गोपीनाथ मुंडे जॉगिंग पार्कचा नादुरुस्त ट्रॅक, नव्या पेठेतील वाहतूक कोंडी आणि शहरात सार्वजनिक मुताऱ्यांचा अभाव या तीन प्रमुख विषयांकडे त्यांनी प्रशासनाचे लक्ष वेधले आहे.



या निवेदनात म्हटले आहे की, दिवंगत लोकनेते गोपीनाथ मुंडे जॉगिंग पार्कवरील वॉकिंग ट्रॅक सध्या मातीचा असल्याने तेथे मोठ्या प्रमाणात चिखल आणि खाचखळगे पडले आहेत. झाडांना पाणी देताना ते ट्रॅकवर साचत असल्याने वयोवृद्ध नागरिकांना चालताना पाय मुरगळण्याच्या जखमा होत आहेत. पाथर्डी-शेवगाव रस्त्यावरील अपघातांच्या भीतीपोटी वामनभाऊ नगर, अर्जुनानगर आणि सावतानगरमधील नागरिक या पार्कला पसंती देतात, मात्र ट्रॅकच्या दुरवस्थेमुळे त्यांची मोठी गैरसोय होत आहे. हा ट्रॅक उंचावून त्याचे काँक्रिटीकरण करावे, अशी मागणी देवढे यांनी केली आहे.

शहराची मुख्य बाजारपेठ असलेल्या नव्या पेठेत पार्किंगच्या अभावामुळे आणि रस्त्याच्या दुतर्फा लावलेल्या दुचाकींमुळे रहदारीला अडथळा निर्माण होत आहे. उन्हाळ्याच्या तीव्र झळा आणि दर दहा मिनिटाला होणारी वाहतूक कोंडी यामुळे नागरिक हैराण झाले आहेत. या रस्त्यावरील चारचाकी वाहनांच्या प्रवेशावर दिवसा बंदी घातल्यास ही कोंडी फुटू शकते, असे निवेदनात सुचवण्यात आले आहे. तसेच, शहरात सार्वजनिक मुताऱ्यांची सोय नसल्याने महिलांची मोठी कुचंबणा होत असून, नागरिक शाळा व मंदिरांच्या आडोशाचा वापर करत असल्याने परिसराचे पावित्र्य धोक्यात आले आहे. केंद्र, राज्य आणि नगर परिषदेत एकाच पक्षाची सत्ता असल्याने निधीची कमतरता नाही, तसेच आमदार मोनिका राजळे यांची कार्यक्षमता पाहता या जनहिताच्या कामांसाठी तातडीने पावले उचलली जावीत, अशी अपेक्षा या निवेदनातून व्यक्त करण्यात आली आहे.

# नवघर ग्रामपंचायतीच्या उपसरपंचपदी काँग्रेसच्या कविता पाटील यांचा दणदणीत विजय!

## 'देरे हरी खाटल्यावरी' हे चालणार नाही-महेंद्रशेठ घरत

लोकनेता न्यूज नेटवर्क

**उरण । विठ्ठल ममताबादे**

उरण तालुक्यातील नवघर ग्रामपंचायतीच्या उपसरपंचपदी काँग्रेसच्या कविता संतोष पाटील यांची बहुमताने निवड झाली. भाजपच्या प्राची पाटील विरुद्ध महाविकास आघाडीच्या कविता पाटील यांच्यात थेट लढत झाली. त्यात काँग्रेसच्या कविता पाटील या दणदणीत मतांनी विजयी झाल्या. यावेळी सरपंच सविता मढवी आणि ग्रामपंचायतीचे सदस्य उपस्थित होते. यावेळी महाविकास आघाडीच्या वतीने विजयाचा जल्लोष करण्यात आला. काँग्रेसचे रायगड जिल्हाध्यक्ष महेंद्रशेठ घरत यांनी नवनियुक्त उपसरपंच कविता पाटील यांचे पुष्पगुच्छ देऊन अभिनंदन केले आणि पुढील वाटचालीस शुभेच्छा दिल्या.

यावेळी बोलताना काँग्रेसचे रायगड जिल्हाध्यक्ष महेंद्रशेठ घरत म्हणाले, गावातील विकासकामे व्हायला हवीत. रस्ते, पाणी या मूलभूत सुविधा प्रत्येक गावाला मिळायलाच हव्यात. त्यासाठी सिडकोसोबत पत्रव्यवहार करून पाठपुरावा करायला हवा. मी आपल्यासाठीच आहे, पण 'देरे हरी खाटल्यावरी' हे चालणार नाही. आपण लढलो पाहिजे. दिबांनी आपल्याला १९८४ च्या शेतकऱ्यांच्या गौरवशाली व शौरशाली लढ्याने न्याय हक्क दिला आहे. सिडकोने ५ टक्के निधी प्रत्येक गावाला द्यायला हवा, पण तसे होताना दिसत नाही. लढल्याशिवाय आपल्याला काहीही मिळणार नाही, हा भूमिपुत्रांचा इतिहास आहे. त्यामुळे दि. बा. पाटील साहेबांची हक्कांसाठी लढण्याची भूमिका आपल्याला विसरून चालणार नाही. सिडकोसोबत लढताना परिस्थितीनुसार रस्त्यावर उतरावे लागेल. आजचा विजय हा महाविकास आघाडीचा असून उरणमध्ये आगामी काळात परिवर्तनाची ही नांदी आहे.

यावेळी काँग्रेसच्या रायगड जिल्हा महिला अध्यक्षा रेखा घरत, उरण तालुकाध्यक्ष विनोद म्हात्रे, संतोष पाटील, उरण शिवसेना तालुका प्रमुख बी. एन. डाकी, अविनाश म्हात्रे, विश्वास तांडेल, रवी पाटील, महादेव बंडा, मुरलीधर ठाकूर, नितीन मढवी, आणि महाविकास आघाडीचे नेते उपस्थित होते.नवघर ग्रामपंचायतीच्या उपसरपंच पदी कविता पाटील यांची निवड झाल्याने त्यांच्यावर सर्वच स्तरातून शुभेच्छा व अभिनंदनाचा वर्षाव होत आहे.



# जिजाऊंचे विचार महिलांनीअंगिकारून स्वाभिमानी परिवार व समाज घडवावा-केंद्रीय मंत्री अनुप्रिया पटेल

## कुर्मी महासभेचे राष्ट्रीय अधिवेशन जबलपूर येथे उत्साहात संपन्न

लोकनेता न्यूज नेटवर्क

**पालघर | श्री तुषार भोईर**

-जिजाऊंचे विचार महिलांनी अंगिकारून स्वाभिमानी परिवार व समाज घडवावा तसेच शिवाजी महाराजांचा व सरदार पटेल यांचे बुलंद विचार कुर्मी समाजाला सक्षम बनवतील, असे प्रतिपादन केंद्रीय मंत्री अनुप्रिया पटेल यांनी केले आहे.अखिल भारतीय कुर्मी क्षत्रिय महासभेचे राष्ट्रीय अधिवेशन व महिला राष्ट्रीय अधिवेशन नुकतेच मध्यप्रदेशातील जबलपूरमधील दाऊ मॅरेज गार्डन, महाराजपूर येथे पार पडले. यावेळी बोलताना अनुप्रिया पटेल यांनी समाजातील अनिष्ट प्रथा, परंपरा यांसह व्यसनाधिनता दूर झाली पाहिजे, असे आवाहनही यावेळी त्यांनी केले. तर समाजातील महिला सक्षम व स्वयंपूर्ण झाली तरच समाज सक्षम व स्वाभिमानी बनेल, असा विश्वासही त्यांनी व्यक्त केला.यावेळी देशभरातून प्रत्येक राज्यातील समाजाचे पदाधिकारी व प्रतिनिधी मोठ्या संख्येने सहभागी झाले होते. या अधिवेशनासाठी मंत्री आशिष पटेल, दशरथ पटेल, रामखिलावन पटेल, खासदार लता वानखेडे, ज्ञानेश्वर पाटील, राकेश सिंह यांसह कुर्मी महासभेचे राष्ट्रीय संरक्षक एल.पी.पटेल, राष्ट्रीय अध्यक्ष डॉ.निरंजन प्रसाद, महासचिव उमेशकुमार पटेल, महिला अध्यक्षा लताऋषी चंद्राकर, युवा अध्यक्ष धीरज पाटीदार यांसह अन्य मान्यवर उपस्थित होते.

देशातील विविध राज्यांतील प्रांतीय पदाधिकारी आपल्या जिल्हाध्यक्षांसह सहभागी झाले होते. महाराष्ट्रातून प्रदेशाध्यक्ष संजय पाटील, महासचिव जयेश शेलार पाटील, कोषाध्यक्ष संदीप काळे पाटील, युवा अध्यक्ष प्रमोद ठोंबे पाटील, महिला प्रदेश अध्यक्षा डॉ. शोभाताई गायकवाड, उद्योग प्रकोष्ठ प्रदेश अध्यक्ष समीर पाटील यांसह अन्य पदाधिकारी उपस्थित होते.यावेळी महाराष्ट्रातील पुरोहित प्रशिक्षक व पुरोहित प्रकोष्ठ कोकण प्रांताध्यक्ष विजय दलवी, कुर्मी पुरोहित डॉ. संदीप वरकुटे, संतोष भुसारे यांचा विशेष सन्मान करण्यात आला.

तर या अधिवेशनात महाराष्ट्र कुर्मी समाजाचे माजी अध्यक्ष दिवंगत डॉ. बाबूलाल सिंह यांच्या स्मरणार्थ समाजासाठी उल्लेखनीय कार्य करणारे अजित राऊत (बोईसर) यांना जीवनगौरव, तुकाराम पष्टे (विरार) यांना वैद्यकीय सेवा रत्न, हरिदास आखरे (बुलढाणा) यांना विश्वभूषण संत तुकाराम महाराज पुरस्कार, प्रमोद ठोंबे (पुणे) यांना छ.संभाजी महाराज युवा रत्न, ड.गोपाल शेळके (रायगड) यांना राजर्षी शाहू महाराज सामाजिक पुरस्कार, निवृत्ती न्याहारकर (नाशिक) यांना कृषी रत्न, संजय गायकवाड (नाशिक) यांना शिक्षण रत्न, दिनेश दळवी (रत्नागिरी) यांना कृषी रत्न, विजय राव (टिटवाळा) यांना उद्योग रत्न, शाहीर उत्तम गायकर (इगतपुरी) यांना सांस्कृतिक कला रत्न तर संदीप काळे (नाशिक) यांना प्रशासकीय रत्न पुरस्कार देऊन गौरविण्यात आले. या महाअधिवेशनात देशभरातील कुर्मितील विविध समाजांचा सहभाग होता. यामध्ये पटेल, पाटीदार, मराठा, कुनबी, कलबी, कुडुंबर, कूर्मि, देवेंद्र कुल वेल्लालर, महतो, गुर्जर, खंडायत, नायक, नायडू, कापू, चंद्राकार, अंजना समाज, कम्मा, ओक्का लिंगा, कुलमी आदी विविध समाजांचे प्रतिनिधी सहभागी झाले होते.







## कन्हेरवाडी साठवण तलावातील पाणी नदीपात्रात सोडण्याच्या मागणी साठी परळी-अंबेजोगाई महामार्गावर जिरेवाडी बायपास येथे उद्या होणाऱ्या रास्ता रोको आंदोलनास मोठ्या संख्येने उपस्थित रहा-राजेभाऊ फड

लोकनेता न्यूज नेटवर्क

**बीड | विजय रोडे**

कन्हेरवाडी साठवण तलावातील पाणी नदीपात्रात सोडण्याच्या मागणीसाठी परळी - अंबेजोगाई महामार्गावर जिरेवाडी बायपास येथे ९ एप्रिल रोजी सकाळी १० वाजता परिसरातील ग्रामस्थांच्या वतीने रास्ता रोको आंदोलन करण्यात येणार आहे. तरी या आंदोलनास मोठ्या संख्येने उपस्थित रहावे असे आवाहन राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पवार पक्षाचे प्रदेश सरचिटणीस तथा कन्हेरवाडीचे माजी सरपंच राजेभाऊ फड यांनी केले आहे.



कन्हेरवाडी साठवण तलावातील पाणी नदीपात्रात सोडण्याची मागणी आता जोर धरू लागली आहे. पाण्याअभावी या भागातील जलाशय कोरडेठाक पडले आहेत. जनावरांना पाण्यासाठी वणवण भटकंती करावी लागत आहे. हा साठवण तलाव अतिशय डोंगराळ भागात असल्याने येथून टँकरने पाणी पुरवठा करणे शक्य होत नाही. त्यामुळे पाणी नदीपात्रात सोडणे हा एकमेव पर्याय आहे.

या साठवण तलावातील पाणी नदीपात्रात सोडल्यास याचा फायदा परिसरातील गावांना होतो. कन्हेरवाडी, जिरेवाडी, ब्रम्हवाडी, जलालपूर, बँक कॉलनी, समता नगर, शंकर पार्वती नगर आदी भागातील जळ पातळीत वाढ होऊन दुष्काळी परिस्थितीपासून दिलासा मिळणार आहे.या आग्रही मागणीसाठी कन्हेरवाडी व परिसरातील नागरीक ग्रामस्थांच्या वतीने परळी - अंबेजोगाई महामार्गावर जिरेवाडी बायपास येथे होणाऱ्या रास्ता रोको आंदोलनास आंदोलनास परिसरातील नागरिकांनी मोठ्या संख्येने उपस्थित रहावे असे आवाहन राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पवार पक्षाचे प्रदेश सरचिटणीस व कन्हेरवाडीचे माजी सरपंच राजेभाऊ फड यांनी केले आहे.

## राघवेंद्र शिंदे यांना जिल्हा मध्यवर्ती बँकेच्या निवडणूक मतदानाचा अधिकार

लोकनेता न्यूज नेटवर्क

**हिमायतनगर | लक्ष्मण शेन्नेवाड**

महाराष्ट्र राज्यातील सहकारी सहकारी संस्थांच्या निवडणुका राज्य निवडणूक प्राधिकरणाने जाहिर केल्याने हिमायतनगर शहरातील सेवा सहकारी सोसायटीच्या संचालक मंडळाची बैठक दि.६ एप्रिल रोजी पार पडली या बैठकीत नांदेड जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँक निवडणूक २०२६ साठी मतदानाचा अधिकार राघवेंद्र प्रकाशराव शिंदे यांना देण्यात यावा अश्या पध्दतीचा ठराव सर्वानुमते घेण्यात आला.जिल्हा मध्यवर्ती बँके चया निवडणूक अनुषंगाने हिमायतनगर येथील सेवा सहकारी सोसायटीच्या वतीने बैठक घेण्यात आली या बैठकीत



राघवेंद्र शिंदे यांना मतदानाचा अधिकार देण्यात यावा यासाठी उदय प्रभाकर देशपांडे यांनी सुचविले आणी त्यास सुभाष जिवनाजी शिंदे यांनी अनुमोदन दिल्याने हा ठराव सर्वानुमते मंजूर करण्यात आला असून त्यांची जिल्हा मध्यवर्ती बँके चया निवडणूक मतदानासाठी बिनविरोध निवड झाल्याने तालुक्यातुन त्यांच्या निवडी बद्दल अभिनंदनाचा वर्षाव होत आहे निवड बैठकीत अध्यक्ष प्रविण प्रकाशराव शिंदे, संचालक उदय प्रभाकर देशपांडे,संदीप दत्तात्रय तुप्तेवार, दत्तात्रय कदम, विठ्ठल ताडेवाड,संजय माने, उत्तम ढोले, मारोतराव राऊत, सौ.शांताबाई चौरे, सुभाष शिंदे, आनंदराव देवकते,सौ. पुष्पाताई मुधोळकर सह सेवा सहकारी सोसायटीचे सचिव यांची उपस्थिती होती.

## डिजिटल लग्नपत्रिकांचा वाढता ट्रेंड; सोयीसोबत आत्मीयतेची उणीव आणि छपाई व्यवसायावर परिणाम

### एका क्लिकचे निमंत्रण : परंपरेचा स्पर्श हरवत चाललाय !


लोकनेता न्यूज नेटवर्क

**किनवट | शेख शौकत**

लग्न म्हणजे दोन व्यक्तींचा नव्हे, तर दोन कुटुंबांना जोडणारा जिव्हाळ्याचा सोहळा. पूर्वी लग्नाचे निमंत्रण देण्यासाठी नातेवाईकांच्या घरी जाऊन आग्रहाने पत्रिका देण्याची परंपरा होती. या भेटीतून नात्यांमध्ये आपुलकी आणि आदर वाढत असे. मात्र बदलत्या काळात डिजिटल माध्यमांचा वापर झपाट्याने वाढला आहे. आता 'सेव्ह द डेट' व्हिडिओ, अँनिमेशन निमंत्रण आणि सोशल मीडियाद्वारे एका

क्लिकमध्ये शेकडो लोकांना निमंत्रण पाठवले जाते. ही पद्धत जलद आणि सोयीची असली, तरी पारंपरिक निमंत्रणातील आत्मीयता कमी झाल्याची भावना व्यक्त होत आहे.

ज्येष्ठ नागरिकांच्या मते, घरी जाऊन दिलेले




निमंत्रण हे केवळ माहिती देणे नसून नात्यांना घट्ट करणारा भावनिक दुवा असतो. डिजिटल निमंत्रणात तो उबदारपणा जाणवत नाही, अशी खंत अनेकांनी व्यक्त केली. दरम्यान, या बदलाचा पारंपरिक छपाई फटका व्यवसायालाही बसत आहे. लग्नपत्रिकांची मागणी घटल्याने प्रिंटिंग प्रेसमध्ये काम कमी झाले असून कामगारांवर उपजीविकेचे संकट निर्माण झाले आहे. पूर्वी लग्नसराईत मोठ्या प्रमाणावर मिळणाऱ्या ऑर्डर्स आता लक्षणीयरीत्या कमी झाल्या आहेत. मात्र दुसरीकडे डिजिटल क्षेत्रात नव्या संधी निर्माण होत आहेत. ग्राफिक डिझाइन, व्हिडिओ एडिटिंग आणि सोशल मीडिया कंटेंट तयार करण्यामध्ये तरुणांना रोजगाराच्या नव्या वाटा खुल्या

झाल्या आहेत. एकंदरीत, डिजिटल सोयीमुळे वेळ आणि खर्च वाचत असला तरी नात्यांमधील जिव्हाळा

टिकवण्यासाठी पारंपरिक पद्धतींचा विचार करणे आवश्यक असल्याचे मत व्यक्त होत आहे.

## ऋचा बंडे हिला डॉ.होमी भाभा बालवैज्ञानिक कांस्य पदक

### मानवतच्या नेताजी सुभाष विद्यालयाच्या विद्यार्थिनीचा गौरव

लोकनेता न्यूज नेटवर्क

**परभणी | रमेश मुलगीर**

ग्रेटर बॉम्बे सायन्स टीचर्स असोसिएशनतर्फे आयोजित करण्यात आलेल्या प्रतिष्ठित 'डॉ. होमी भाभा बालवैज्ञानिक स्पर्धा २०२५-२६' मध्ये मानवत येथील नेताजी सुभाष विद्यालयाची इयत्ता सहावीची विद्यार्थिनी कुमारी ऋचा विनायक बंडे हिने घवघवीत यश संपादन केले आहे. या विज्ञान टॅलेंट सर्च स्पर्धेत ऋचाने आपल्या बुद्धिमत्तेची चुणूक दाखवत कांस्य पदक (Bronze Medal) पटकावले असून तिला 'बालवैज्ञानिक' पदवीने सन्मानित करण्यात आले आहे.छत्रपती संभाजीनगर विभागातून मराठी माध्यमातून शिक्षण घेणाऱ्या ऋचाने या कठीण स्पर्धेत उत्कृष्ट कामगिरी केली. ऋचाला या यशासाठी शाळेतील विज्ञान शिक्षक श्री. गणेश बारहाते सर यांचे मोलाचे मार्गदर्शन लाभले. त्यांच्या मार्गदर्शनाखाली तिने प्रयोगांची तयारी आणि वैज्ञानिक सिद्धांतांचा अभ्यास यशस्वीपणे पूर्ण केला होता. ५ एप्रिल २०२६ रोजी पार पडलेल्या सोहळ्यात तिला हे पदक आणि प्रमाणपत्र देऊन गौरविण्यात आले.ऋचाच्या या यशाबद्दल शाळेचे मुख्याध्यापक




संजय लाड यांनी तिचे विशेष कौतुक केले आहे. ऋचा विनायक बंडे हिने मिळवलेले हे यश शाळेसाठी अभिमानास्पद असून, बारहाते सरांचे मार्गदर्शन आणि ऋचाची जिद्द यामुळेच हे शक्य झाले आहे, अशा शब्दांत त्यांनी तिला पुढील वाटचालीस शुभेच्छा दिल्या.

ग्रेटर बॉम्बे सायन्स टीचर्स असोसिएशनचे अध्यक्ष अच्युतराव माने, सचिव डॉ. नीलिमा मुळगुंद आणि खजिनदार संदीप शिंदे यांनीही ऋचाच्या यशाचे कौतुक केले आहे. या यशाबद्दल संपूर्ण मानवत परिसरातून ऋचा आणि तिच्या मार्गदर्शकांवर अभिनंदनाचा वर्षाव होत आहे.

## डॉ.बाबासाहेब आंबेडकर बहुजन कर्मचारी समितीची बैठक उत्साहात संपन्न



लोकनेता न्यूज नेटवर्क

**लातूर | शिवाजी निरमनाळे**

डॉ.बाबासाहेब आंबेडकर बहुजन कर्मचारी जयंती उत्सव समितीची बैठक महात्मा बसवेश्वर महाविद्यालयात संपन्न झाली. या बैठकीला नवनियुक्त प्राचार्य प्रो.डॉ.सिद्राम डोंगरगे, प्रा.डॉ.बाळासाहेब गोडबोले, प्रा.डॉ.संजय गवई, प्रा.कल्याण कांबळे, ड.सुरेशचंद्र सलगरे, प्रा.संगमेश्वर पानगावे, गंगाधर शिनगारे आणि प्रा.प्रशांत उघाडे यांची उपस्थिती होती.बैठकीच्या प्रारंभी महात्मा बसवेश्वर महाविद्यालयाच्या प्राचार्यपदी प्रो.डॉ.सिद्राम डोंगरगे यांची नियुक्ती झाल्याबद्दल समितीच्यावतीने त्यांचा यथोचित सत्कार करण्यात आला.

या महिन्यात महात्मा जोतिबा फुले, डॉ.बाबासाहेब आंबेडकर आणि महात्मा बसवेश्वर या महापुरुषांच्या जयंत्या आहेत. तसेच वर्षभरात येणाऱ्या महापुरुषांच्या जयंत्या, पुण्यतिथी आणि विविध उपक्रम राबविण्याच्या दृष्टिकोनातून सविस्तर चर्चा करण्यात आली. समितीचे व्यापक उद्दिष्ट समोर ठेवून महापुरुषांच्या आठवणी आणि विचारधारा समाजातील प्रत्येक घटकापर्यंत रुजविण्याच्या अनुषंगाने समितती कार्यरत राहील असा विश्वास व्यक्त करण्यात आला.

सर्व बुद्धीजीवी बहुजन कर्मचारी यांनी समितीत सहभागी होऊन समिती बळकट करणे काळाची गरज आहे, समितीच्या माध्यमातून विविध क्रीडा स्पर्धा, अनाथ, अंध, विद्यार्थ्यांसाठी सहाय्यपुरक उपक्रम, विविध व्याख्याने, कार्यशाळा, परिसंवाद आणि चर्चासत्र आयोजीत करण्याच्या उद्देशाने सर्वांनी मनोगते व्यक्त केली.तसेच व्यापक नियोजन करण्यासाठी पुढील बैठक शुक्रवार दि.१० एप्रील २०२६ रोजी सायं. ०५ वा. महात्मा बसवेश्वर महाविद्यालयात आयोजित करण्याचे ठरविण्यात आले. या बैठकीचे सूत्रसंचालन, प्रास्ताविक आणि आभार प्रा.प्रशांत उघाडे यांनी केले.

### परळी शहरातील नगरपरिषद अतिक्रमण हटाव मोहीमेत मतभेद का?

## सर्वसमान अतिक्रमण हटाव मोहीम राबवा अन्यथा कायदेशीर रित्या न.प.कार्यालयासमोर उपोषण करणार-वैजनाथ फड

लोकनेता न्यूज नेटवर्क

**बीड | विजय रोडे**

परळी :-गेल्या अनेक वर्षांपासून परळी शहरातील जवळपास सर्वच रस्त्यांवर अतिक्रमणं मोठ्या प्रमाणावर झालेली आहेत. अतिशय सुटसुटीत व वाहतूकीला विना अडथळा होत असतांनाही वाहतूक कोंडी, अस्ताव्यस्त रचना आणि बेशिस्त पार्किंग यामुळे सर्वांनाच प्रचंड त्रास सहन करावा लागत लागत आहे. त्यामुळे आपणच आपले शहर सुटसुटीत आणि शिस्तबद्ध बनवण्यासाठी आता परळी नगर परिषद प्रशासनानेही धाडसी निर्णय घेतला आहे

परळी वैजनाथ नगरपरिषद अतिक्रमण हटाव विशेष मोहीम सुरु असून परळी शहरात वाढत्या अतिक्रमणांमुळे निर्माण झालेली वाहतूक कोंडी, अस्वच्छता आणि नागरिकांना भेडसावणाऱ्या विविध समस्यांच्या पार्श्वभूमीचर नगरपरिषद प्रशासनाने अतिक्रमण हटावाची विशेष मोहीम हाती घेतली आहे. शहरातील मुख्य रस्ते, फूटपाथ, नाले तसेच इतर सार्वजनिक ठिकाणांवर झालेले अतिक्रमण



हटवून शहर सुटसुटीत आणि शिस्तबद्ध करण्याचा प्रशासनाचा प्रयत्न सुरु आहेत नगरपरिषदे कडून जाहीर करण्यात आलेल्या सूचनेनुसार, शहरातील सर्व नागरिक, व्यावसायिक व दुकानदारावर गोरगरीब व्यापारी यांच्या समोरील अतिक्रमण काढण्याचा धूमधडाका सुरु असून हे अतिक्रमण मोठ्या. या निर्णयाबाबत आपला विरोध नसून गरीब श्रीमंत राजकीय व्यवसायिक यांना माफ करत सामान्य व्यापाऱ्यांची हॉटेल घर दुकानाची मोडतोड होत आहे असा गंम्भीर आरोप करत सरसकट अतिक्रमण एक लाईन हटाव मोहीम राबवा अन्यथा परळी नगर परिषद कार्यालया समोर कायदेशीर रित्या आमरण उपोषण करण्याचा इशारा दिला आहे. माहितीस्तव राज्याचे मुख्यमंत्री. देवेंद्र फडणवीस. उपमुख्यमंत्री. एकनाथ शिंदे साहेब. उपमुख्यमंत्री. सुनेत्राताई पवार. तसेच जिल्हाधिकारी कार्यालय बीड. पोलीस अधीक्षक कार्यालय बीड. उपजिल्हा अधिकारी कार्यालय परळी न प. कार्यालय परळी यांना व्हिडीओसह.फोटो या पुराव्यासह निवेदन देऊन उपोषण करणार असल्याची माहिती दिली आहे.तरी

नगरपरिषद प्रशासनाने सर्व नागरिक आणि व्यापाऱ्यांना सर्व समान मतभेद नकरता सरसकट अतिक्रमण हटवावं असे आव्हान वैजनाथ फड यांनी केले आहे.

# मोगरगा येथे अखंड हरिनाम सप्ताह व ग्रंथराज ज्ञानेश्वरी पारायण सोहळा साजरा

## रामायनाचार्य ह.भ.प दिनकर महाराज निकम मोगरगेकर यांच्या सुश्राव्य काल्याच्या किर्तनाने सप्ताहाची सांगता

लोकनेता न्यूज नेटवर्क

**जीवन जाधव । औसा**

औसा तालुक्यातील मोगरगा येथे गेल्या ३५ वर्षापासुन ग्रामदैवत केदारलिंग महाराज यांच्या यात्रे निमीत्त अखंड हरिनाम सप्ताह व ग्रंथराज ज्ञानेश्वरी परायण सोहळा आयोजीत केला जातो ,मोगरगा हे गाव संताची भुमी व सांप्रदायांचा वारसा लाभलेल गाव मनुन मोगरगा गावची ओळख आहे ,या गावातील ग्रामदैवत केदारलिंग महाराज या देवाची ख्याती खुप मोठी असुन केदारलिंग महाराज हा देव नवसाला पावणारा देव मनुन ही ओळखल जात, प्रत्येक वर्षी केदारलिंग



महाराजांची यात्रा साजरी केली जाते यात्रेचे औचित्य साधुन गावातील लेकमाता ,व नौकरीसाठी बाहेरगावी असलेले गावातील ग्रामस्थ केदारलींग यात्रेसाठी गावी येत असतात व मोगरगा सह परीसरातील हजारो भाविक केदारलिंग महाराज यात्रेसाठी आवर्जुण मोगरगा येथे उपस्थीत राहतात व केदारलिंग महाराजांचे मनोभावे दर्शन घेतात ,मोगरगा येथील अखंड हरिनाम सप्ताहात रामायनाचार्य ह.भ.प दिनकर महाराज यांच्या सुश्राव्य वाणीतुन भाविकासाठी रामकथेच आयोजन करण्यात आले होते,यावेळी रामायनाचार्य ह.भ.प दिनकर महाराज निकमव्यासपिठ अधिकारी ह.भ.प भगवान महाराज टोंपे,दिलीप रुबदे , सरपंच रवि निकम ,उपसरपंच संभाजी मुळजे ,तातेराव निकम,अरविंद निकम ,शशिकांत क्षिरसागर ,शिवाजी महाराज उत्का,प्रशांत महाराज निकम ,चोपदार सतिश लकडे ,अंगद जळकोटे,चंद्रकांत बनसोडे,तानाजी चांदुरे,ऊद्धव रुब्दे,सुमीत निकम. कैलास गिरी,रोहन हासकुडे.डिगंबर चांदुरे ,वैभव हासकुडे,प्रथमेश निकम ,मधुकर निकम ,सुमित येवते ,प्रणव सोनवने,ओम लकडे ,तानाजी पाटील ,मारुती सोनवने ,दत्ता पाटील ,सुधाकर सोनवने ,प्रशात पाटील ,सरपंच रवि नीकम ,निवृती टोंपे ,रघुनाथ चांदुरे ,मधुकर निकम ,अंगद जळकोटे ,पप्पु पांचाळ ,शिवाजी निकम ,सह मोगरगा येथील केदारलींग महिला व पुरुष भजनी मंडळ सह सप्ताहात सात दिवस चहा पाणी व्यवस्था व यात्रेत ,केदारलिंग मित्र मंडळ मोगरगा यांच्या वतिने सेवा अपर्ण करण्यात आली ,

# नांदेड स्थानिक गुन्हे शाखेची मोठी कारवाई

## घरफोडी प्रकरणाचा उलगडा; आरोपी अटकेत, ३.९० लाखांचा मुद्देमाल जप्त

लोकनेता न्यूज नेटवर्क

**नांदेड । अनिल पाटील तेलंग**

नांदेड (प्रतिनिधी)-नांदेड जिल्ह्यातील वाढत्या घरफोडीच्या घटनांना आळा घालण्यासाठी राबविण्यात येत असलेल्या मोहिमेला यश मिळाले असून स्थानिक गुन्हे शाखा पोलिसांनी कारवाई करत घरफोडी प्रकरणातील एका सराईत आरोपीला अटक केली आहे. आरोपीकडून सोन्या-चांदीचे दागिने असा एकूण ३ लाख ९० हजार ३३२ रुपयांचा मुद्देमाल जप्त करण्यात आला आहे.



या प्रकरणी नांदेड ग्रामीण पोलीस ठाण्यात गुन्हा क्रमांक ११९५/२०२५ अन्वये भारतीय न्याय संहितेच्या कलम ३३१ (४) व ३०५ अंतर्गत गुन्हा दाखल करण्यात आला होता. तपासादरम्यान पोलिसांना गोपनीय माहिती मिळाल्यानंतर सापळा रचून शेख जावेद उर्फ जेबी शेख खुर्शीद (वय २३, रा. जोगनगर, नांदेड) याला ताब्यात घेण्यात आले. पोलीस चौकशीत आरोपीने गुन्ह्याची कबुली दिली. त्यानुसार त्याच्याकडून सोन्या-चांदीचे दागिने व इतर ऐवज जप्त करण्यात आला. या कारवाईमुळे परिसरातील घरफोडीच्या घटनांवर आळा बसण्याची शक्यता व्यक्त केली जात आहे. ही कारवाई स्थानिक गुन्हे शाखेचे पोलीस निरीक्षक उदय खंडेराय यांच्या नेतृत्वाखाली सहाय्यक पोलीस निरीक्षक रवि वाहुळे व पोलीस कर्मचारी यांच्या पथकाने ही कारवाई यशस्वीरीत्या पार पाडली. दरम्यान, या प्रकरणाचा पुढील तपास नांदेड ग्रामीण पोलीस ठाण्याचे अधिकारी करीत असून, आरोपीकडून आणखी गुन्ह्यांचा उलगडा होण्याची शक्यता पोलिसांनी व्यक्त केली आहे.

# कन्हेरीवाडी तलावातील पाणी कन्हेरवाडी नदीपात्रात तात्काळ सोडा-श्रीराम मुंडे

## जिल्हा प्रशासनाचे पाणी सोडण्याचे आश्वासन

लोकनेता न्यूज नेटवर्क

**बीड। विजय रोडे**

परळी येथील जनता दरबारात ना पंकजाताई मुंडे यांनी जिल्हा अधिकारी यांना फोन करून सांगितले होते की तात्काळ पिढी सोडावे.

कन्हेरवाडी गावामध्ये पाण्याची पातळी व पाण्याचा स्रोत अत्यंत कमी झालेला आहे.गावातील नागरिकांना पिण्यासाठी व वापरासाठी पाण्याची अत्यंत टंचाई निर्माण झालेली आहे.गावातील पाळीव गुरे व जनावरे यांना सुद्धा पाण्याची अत्यंत पिण्यासाठी पाण्याची निकडीची गरज असल्याने कन्हेरवाडी लघुसिंचन तलावातील पाणी नदीपात्रात सोडावे अशी मागणी कन्हेरवाडी सेवा सह.सोसायटीचे अध्यक्ष भाजपाचे जेष्ठ नेते श्रीराम मुंडे यांनी केली आहे.



याबाबत जिल्हाधिकारी बीड यांना राज्याच्या पशुसंवर्धन व पर्यावरण मंत्री ना.पंकजाताई मुंडे,माजी खा.प्रितमताई मुंडे यांच्या मार्गदर्शनाखाली निवेदन देण्यात आले असुन यात सध्या उन्हाळा सुरू असल्यामुळे नदीपात्रात पाणी सोडल्यास कन्हेरवाडी बरोबर बँक कॉलनी,जलालपूर,शंकर पार्वती नगर,समता नगर,जिरेवाडी, इंदपवाडी,ब्रह्मवाडी या भागातील पाणीपातळीमध्ये वाढ होवुन पिण्याच्या पाण्याचा प्रश्न सुटेल असे नमूद करण्यात आले आहे.सदरील तलावातील पाणी नदीपात्रात सोडण्याचे आश्वासन जिल्हा प्रशासनाने दिले आहे.या निवेदनावर श्रीराम मुंडे यांच्यासह विलास मुंडे ,महादेव कंडुकटले,विष्णु मुंडे,ज्ञानोबा फड,विशाल मुंडे, बाबासाहेब ढाकणे,रमाकांत मुंडे, देविदास फड आदींच्या स्वाक्षऱ्या आहेत.

# डॉ.बाबासाहेबांच्या स्वप्नातील नदीजोड प्रकल्प; जलसंकटावर कायमचा उपाय!

## २०१६ पासून वसुंधरा प्रतिष्ठानचा लढा तीव्र; ५० हजारांहून अधिक स्वाक्षऱ्यांद्वारे केंद्र-राज्य सरकारचे लक्ष वेधले

लोकनेता न्यूज नेटवर्क

**लातूर । शिवाजी निरमनाळे**

महामानव डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी देशातील पाण्याचा प्रश्न कायमचा सोडवण्यासाठी १९३५ मध्ये 'नदीजोड प्रकल्प' ही दूरदृष्टी मांडली होती. देशातील पाण्याचे




असमतोल वितरण दूर करून दुष्काळग्रस्त भागांना दिलासा देण्याचा हा महत्त्वाकांक्षी विचार आजही अपूर्णच आहे. परिणामी, देशभरात अनेक भागांमध्ये तीव्र पाणीटंचाईची समस्या कायम आहे. दरम्यान, नदी जोड प्रकल्प कार्यान्वित करून या प्रकल्पला डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचे नाव द्यावे यासाठी वसुंधरा प्रतिष्ठान तर्फे ८ एप्रिल ते १४ एप्रिल या कालावधीत स्वाक्षरी मोहीम राबविली जात आहे. या मोहिमेला पहिल्याच दिवशी प्रचंड प्रमाणात प्रतिसाद भेटला.

देशाच्या एका भागात सतत पूर परिस्थिती आणि काही भागात सतत दुष्काळ पडतो आहे. पाण्याचा समतोल नसल्यामुळे अनेक समस्यांना सामोरे जावे लागत आहे. हीच बाब लक्षात घेऊन लातूर येथील वसुंधरा प्रतिष्ठानने २०१६ पासून 'नदीजोड प्रकल्प' कार्यान्वित करण्यासाठी लोकचळवळ उभी केली आहे. प्रतिष्ठानचे संस्थापक अध्यक्ष प्रा. योगेश शर्मा यांच्या नेतृत्वाखाली सुरू झालेल्या या अभियानांतर्गत आतापर्यंत ५० हजारांहून अधिक नागरिकांच्या स्वाक्षऱ्या गोळा करून पंतप्रधान, राष्ट्रपती तसेच राज्याच्या मुख्यमंत्र्यांकडे निवेदन सादर करण्यात आले आहे. दरवर्षीप्रमाणे यंदाही १४ एप्रिल रोजी डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या जयंतीनिमित्त या मोहिमेला अधिक गती देण्यात येत आहे. वसुंधरा प्रतिष्ठानच्या माध्यमातून पुन्हा व्यापक स्वाक्षरी मोहीम राबविण्यात येत असून नागरिकांकडून उत्स्फूर्त प्रतिसाद मिळत आहे. नदीजोड प्रकल्प हाच देशाच्या जलसमस्येवर कायमचा उपाय ठरू शकतो, असा विश्वास प्रतिष्ठानकडून व्यक्त केला जात आहे.

### प्रकल्प एक, फायदे अनेक नदीजोड प्रकल्पाचे फायदे

**नदीजोड प्रकल्पामुळे देशातील पाण्याचे समतोल वितरण साध्य होऊन दुष्काळग्रस्त भागांना मोठा दिलासा मिळू शकतो. अतिरिक्त पाण्याचा वापर सिंचनासाठी केल्याने शेती उत्पादनात वाढ होईल आणि शेतकऱ्यांचे उत्पन्न स्थिर राहील. भूजल पातळी सुधारण्यास मदत होऊन पिण्याच्या पाण्याची टंचाई कमी होईल. पूरग्रस्त भागांतील अतिरिक्त पाणी दुसरीकडे वळवता आल्याने पूरस्थितीवर नियंत्रण ठेवता येईल. उद्योग, वीज निर्मिती आणि जलवाहतूक यांनाही चालना मिळेल. पर्यावरणीय समतोल राखण्यास मदत होऊन ग्रामीण अर्थव्यवस्थेला नवी दिशा मिळू शकते. त्यामुळे 'नदीजोड प्रकल्प' हा देशाच्या सर्वांगीण विकासासाठी अत्यंत महत्त्वाचा ठरू शकतो.**

# घोडनदी बंधाऱ्यामुळे शिरूरकरांना दिलासा ४५ दिवस पाणी पुरवठा निश्चित

लोकनेता न्यूज नेटवर्क

**पुणे । फिरोज सिकलकर**

शिरूर : शहराच्या पिण्याच्या पाण्याच्या टंचाईवर तात्पुरता तोडगा निघाला असून घोडनदीवरील कोल्हापुरी पद्धतीचा बंधारा पूर्ण क्षमतेने भरून घेण्यात आला आहे. त्यामुळे शिरूर शहरातील नागरिकांचा सुमारे ४५ दिवसांचा पिण्याच्या पाण्याचा प्रश्न मिटला असल्याची माहिती नगराध्यक्षा ऐश्वर्याताई पाचर्णे व मुख्याधिकारी प्रितम पाटील यांनी दिली.बंधाऱ्यात पाणी उपलब्ध करून देण्यासाठी आमदार ज्ञानेश्वर उर्फ माऊली आबा कटके यांनी पाटबंधारे विभागाशी संपर्क साधून पाठपुरावा केला होता. त्यांच्या प्रयत्नांमुळे बंधारा पूर्ण भरून घेण्यात यश आले आहे.



मात्र, घोडनदी पात्रालगत काही नागरिक व शेतकऱ्यांकडून मोटार पंप व वीजपंपाद्वारे अनधिकृतपणे पाणी उपसा होत असल्याचे प्रशासनाच्या निदर्शनास आले आहे. यामुळे शहराच्या पाणीपुरवठ्यावर परिणाम होण्याची शक्यता व्यक्त करण्यात येत आहे.

या पार्श्वभूमीवर, अनधिकृत वीजपंपांचा विद्युत पुरवठा खंडित करण्यासाठी नगरपरिषदेमार्फत महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण महामंडळ (एमएसईबी) कार्यालयाशी लेखी पत्रव्यवहार करण्यात आला आहे. तसेच जिल्हाधिकारी, पुणे व तहसीलदार, शिरूर व पारनेर यांनाही याबाबत कळविण्यात आले असून पुढील कारवाई सुरू आहे.दरम्यान, उपलब्ध पाण्याचा योग्य व काटकसरीने वापर करावा, असे आवाहन नगराध्यक्षा ऐश्वर्याताई पाचर्णे यांनी शिरूरकरांना केले आहे.

# १२ एप्रिल रोजी अंबाजोगाई येथील विघ्नहर्ता डेंटल केअरचा प्रथम वर्षपूर्ती सप्ताह निमित्त विविध उपचारांवर २५ टक्क्यांपर्यंत सवलत

लोकनेता न्यूज नेटवर्क

**बीड । विजय रोडे**

शहरातील नवाब नगर, मांडवा रोड परिसरातील डॉ.प्रणव प्रवीण उमराणे यांच्या विघ्नहर्ता डेंटल केअरचा प्रथम वर्धापन दिन १२ एप्रिल रोजी उत्साहात साजरा होणार आहे. गेल्या एका वर्षात रुग्णांना दर्जेदार व विश्वासार्ह दंतसेवा देत या दवाखान्याने अनेकांच्या चेहऱ्यावर सुंदर हास्य फुलवले आहे.या वर्धापन दिनानिमित्त दि. १० एप्रिल ते १७ एप्रिल २०२६ दरम्यान प्रथम वर्षपूर्ती सप्ताह आयोजित करण्यात आला असून, या कालावधीत रुग्णांसाठी मोफत दंत तपासणी तसेच विविध उपचारांवर २५ टक्क्यांपर्यंत सवलत दिली जाणार आहे.या उपक्रमांतर्गत स्माईल डिझायनिंग, रूट कॅनाल ट्रीटमेंट, स्केलिंग (दात स्वच्छ करणे), इम्प्लांट्स व डेंचर्स, वाकडे दात सरळ करणे, अक्कल दाढ शस्त्रक्रिया तसेच लहान मुलांसाठी विशेष दंतसेवा उपलब्ध करून देण्यात येणार आहे.

या कार्यक्रमाचा व विशेष सवलतींचा अंबाजोगाई शहर व पंचक्रोशीतील रुग्णांनी मोठ्या संख्येने लाभ घ्यावा व ७६६६३१२७०१ या क्रमांकावर नोंदणी करून वरील उपचारांचा लाभ घ्यावा असे आवाहन विघ्नहर्ता डेंटल केअरतर्फे डॉ.प्रणव प्रवीण उमराणे यांनी केले आहे.

# श्री सालशिद्धबाबा यात्रेसाठी मिडसांगवी सज्ज

## ११ ते १३ एप्रिलदरम्यान विविध धार्मिक व सांस्कृतिक कार्यक्रमांचे आयोजन

लोकनेता न्यूज नेटवर्क

**बाळासाहेब खेडकर । पाथर्डी**

पाथर्डी तालुक्यातील मिडसांगवी येथे श्री सालशिद्धबाबा देवस्थान यात्रा मोठ्या उत्साहात साजरी होणार असून दि. ११, १२ व १३ एप्रिल २०२६ रोजी विविध धार्मिक व सांस्कृतिक कार्यक्रमांचे आयोजन करण्यात आले आहे. या यात्रेनिमित्त परिसरात भक्तिमय वातावरण निर्माण झाले आहे.शनिवार दि. ११ एप्रिल रोजी रात्री ९ वाजता ह.भ.प. निवृत्ती महाराज इंदोरीकर यांचे हरिकीर्तन होणार आहे. रविवार दि. १२ एप्रिल रोजी सकाळी ९.३० ते १२.३० या वेळेत ह.भ.प. महंत न्यायाचार्य डॉ. नामदेव महाराज शास्त्री यांच्या प्रमुख उपस्थितीत तसेच ह.भ.प. महंत हनुमंत महाराज शास्त्री यांच्या शुभहस्ते विविध धार्मिक विधी पार पडणार आहेत. यामध्ये कावड यात्रेचे पाणी आणून श्रींना स्नान घालण्यात येणार असून सायंकाळी छबीना मिरवणूक व आकर्षक फटाक्यांची आतषबाजी होणार आहे.रविवार रात्री ९ ते १२ या वेळेत संगीत मैफिल व रंगारंग कार्यक्रम आयोजित करण्यात आले आहेत. सोमवार दि. १३ एप्रिल रोजी रात्री लोकनाट्य तमाशाचा बहारदार कार्यक्रम होणार असून दुपारी ४ ते ६ या वेळेत कुस्त्यांचा जंगी आखाडा भरविण्यात येणार आहे. या यात्रेनिमित्त कुस्त्यांसाठी रोख बक्षिसांचीही व्यवस्था करण्यात आली असून प्रथम, द्वितीय व तृतीय क्रमांकासाठी आकर्षक बक्षिसे ठेवण्यात आली आहेत.या कार्यक्रमाचा लाभ घेण्यासाठी परिसरातील नागरिकांनी मोठ्या संख्येने उपस्थित राहावे, असे आवाहन श्री सालशिद्धबाबा देवस्थान ट्रस्ट व मिडसांगवी ग्रामस्थांच्या वतीने करण्यात आले आहे.



**मिडसांगवी येथे होणाऱ्या श्री सालशिद्धबाबा यात्रेनिमित्त दिनांक १२ ते १४ एप्रिल २०२६ दरम्यान परिसरात मटण व मांस विक्री पूर्णतः बंद ठेवण्यात यावी, अशी मागणी विश्व हिंदू परिषद व बजरंग दलाच्या वतीने करण्यात आली आहे.यासंदर्भात पाथर्डी पोलीस स्टेशनचे पोलीस निरीक्षक यांना निवेदन देण्यात आले असून यात्रेदरम्यान धार्मिक भावना जपण्यासाठी तसेच गावातील शांतता व सुव्यवस्था अबाधित राहण्यासाठी ही कारवाई करावी, अशी विनंती करण्यात आली आहे.**

हे पत्रक,मालक,मुद्रक, प्रकाशक संपादक ज्ञानेश्वर भाऊसाहेब मुंढे यांनी न्यू गीता प्रिंटिंग प्रेस मिरकाळा ता गेवराई जि बीड ४३११२७ येथे छापून दैनिक लोकनेता कार्यालय हो.नं ५०,मेन रोड मिरकाळा ता गेवराई जि बीड ४३११२७ (महाराष्ट्र) येथे प्रकाशित केले आहे. मो.नं ७४९९६१५९३३ .या अंकात प्रकाशित झालेल्या बातम्या व लेखा या मधून व्यक्त झालेल्या मताशी संपादक सहमत असतीलच असे नाही (वाद विवाद गेवराई न्यायालयाअंतर्गत)

This Newspaper is printed by owner, printer, publisher editor Dyaneshwar Bhausaheb Mundhe at New Geeta Printing Press Mirkala Ta Gevrai District Beed 431127 and published at Dainik Lokneta Office Ho.No. 50, Main Road Mirakala Ta Gevarai District Beed 431127 (Maharashtra) Mo no 7499615933